# अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक, करोना

## पुरन्दरे चन्द्रशेखर

अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक पार पडली. जो बायडेन हा डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प याचा पराभव करून निवडून आला. या सरळ दिसणाऱ्या चित्राला अनेक पदर आहेत. एक उमेदवार हरतो, दुसरा जिंकतो इतके हे साधे समीकरण नाही. त्याला प्रमुख दृश्य कारण म्हणजे डोनाल्ड ट्रम्प. लोकशाही हे मूल्य, त्यातील पराभव मान्य करणे त्याच्या प्रकृतीत बसत नाही. त्यामुळे निवडणूक संपली, निकाल जाहीर होऊ लागले आणि तो पिछाडीला आहे हे दिवसागणिक स्पष्ट होऊनही त्याने मीच निवडणूक जिंकलो हा धोशा लावून धरला.

त्यामुळे अमेरिकेत व जगातही अभूतपूर्व अनिश्चितता निर्माण झाली. मतदान पहाता ट्रम्पला बायडेनपेक्षा कमी मते मिळाली. पण निवडणूकच अविश्वासार्ह होती, मतपत्रिकांमध्ये हेराफेरी झाली, पोस्टाने पाठवलेल्या मतांमध्ये गडबड करण्यात आली [करोनामुळे अनेक लोकांनी पोस्टाने मते पाठवली] असे दावे ट्रम्पने केले. त्याची पूर्वतयारी म्हणून अमेरिकन पोस्ट खाते अक्षम आहे, रशिया व चीन निवडणुकीत ढवळाढवळ करत आहेत अशी वातावरणनिर्मिती आधीपासून होत होती. मी हरलो तर निवडणुकीतील अफरातफरीमुळेच हरेन असेही त्याने गेले अनेक महिने म्हटले आहे. वस्तुत:, निर्वाचन अधिकारी, विविध राज्यातील निवडणुकीवर नजर ठेवणारे निरीक्षक हे पुन्हा पुन्हा प्रतिपादन करत आहेत की ही निवडणूक अमेरिकेच्या इतिहासातील सगळ्यात स्वच्छ निवडणूक होती. तिच्यात गैरव्यवहार झाले नाहीत. हीच भूमिका घेणाऱ्या सर्वोच्च निवडणूक आयुक्तालाच ट्रम्पने नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात काढून टाकले.

या अजून [नोव्हेंबर तिसरा आठवडा] चालू असणाऱ्या नाट्यामागे अदृश्य कारणेही आहेत. ती पहाता अमेरिकन लोकशाही व्यवस्थात्मक सदोष आहे हे दिसते.

जगात जेथे निर्वाचित लोकशाही आहे, तेथे ज्या पक्षाला किंवा उमेदवाराला जास्त मते मिळतात, तो विजयी होतो. अमेरिकेत तसे नाही. तेथे दोन स्तरांवर चाळणी होते. लोक मतदान करतात - अध्यक्षीय निवडणुकीत हा उमेदवार किंवा तो उमेदवार असा निवाडा करतात, पण विजयी उमेदवार त्यावर ठरत नाही. अध्यक्ष निवडणारे निर्वाचन अधिकारी प्रत्येक राज्य नेमते. सगळी राज्ये मिळून देशात हे नियुक्त अधिकारी [निर्वाचक. एकूण ५ ३ ८ आहेत] ते ५ ३ ८ जण अध्यक्ष निवडतात. या व्यवस्थेला electoral college म्हणतात. ही व्यवस्था अमेरिकेच्या जन्मापासून अंमलात आहे. अध्यक्षावर लोकांचे प्रत्यक्ष नियंत्रण [direct control] राहू नये हा त्यामागचा हेतू. त्यामागे अमेरिकेतील गुलामगिरीचा म्हणजे वर्णद्वेषाचा इतिहास आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये राष्ट्र अस्तित्वात आल्यानंतरही सुमारे शंभर वर्षे गुलामगिरी कायदेशीर होती. गुलाम आफ्रिकेतून सक्तीने आणलेले कृष्णवर्णीय. त्या राज्यांना या योजनेमुळे जास्तीचे वजन मिळाले. परिणामत: एका अभ्यासानुसार या अप्रत्यक्ष - पडद्यामागच्या - निवडणुकीने रिपब्लिकन पक्षाला ४ ते ५ टक्के जास्त मते मिळतात. जेव्हा निवडणूक अटीतटीची होते तेव्हा ही टक्केवारी महत्त्वाची ठरते. बहुधा electoral college लोकमतानुसार निवड करते . पण प्रत्येक वेळी तसे होईलच याची शाश्वती नसते. म्हणजे एखाद्या उमेदवाराला लोकांची जास्त मते मिळाली तरी निर्वाचकांच्या निवडीत तो हरू शकतो. २ ० ० ० च्या अध्यक्षीय निवडणुकीत डेमोक्रॅट उमेदवार अल गोर याला प्रतिस्पर्धी जॉर्ज बुशपेक्षा प्रत्यक्ष मतदानानुसार अधिक मते मिळाली पण electoral college नुसार जॉर्ज बुश विजयी झाला व अध्यक्ष झाला. तोच प्रकार २ ० १ ६ च्या हिलरी क्लिंटन विरुद्ध ट्रम्प या निवडणुकीत झाला व ट्रम्प अध्यक्ष झाला.

या व्यवस्थेत नजीकच्या भविष्यात बदल होणार नाही कारण त्यासाठी घटनादुरुस्ती लागेल. त्यासाठी दोन्ही पक्षाची

संमती लागेल. सध्या तर अमेरिकेतील पक्षीय राजकारण अतिशय दूषित आहे.

दुसरे पडद्यामागचे कारण म्हणजे रिपब्लिकन पक्ष त्याला गैरसोयीचे असणारे मतदार पद्धतशीररीत्या मतदारयादीतून वगळतो, खोटे फोन केले जातात - या निवडणुकीत लाखो अमेरिकनांना 'सुरक्षित राहा, घरीच थांबा' असे यांत्रिक फोन आले. म्हणजे मतदान करू नका हा संदेश. विशेषत: कृष्णवर्णीय-बहुल इलाक्यात. तो ज्यांनी ऐकला, त्यांनी मतदान केले नाही. दुसरी शक्कल म्हणजे, मतदान केंद्रे कमी केली जातात, उदा. टेक्सास राज्यातील ह्यूस्टन शहरात मतदान केंद्रे तेथील रिपब्लिकन गव्हर्नरने अचानक ११ वरून एक वर आणली. परिणामत: ५० लाख लोकांसाठी एक मतदानकेंद्र राहिले. २०१८च्या फ्लोरिडा राज्यातील मतदानात अशा डाव-पेचांमुळे सहातील एक कृष्णवर्णीय मतदान करू शकला नाही. एकूण तर नऊ लाख लोक मतदानाला अपात्र ठरले.

तिसरे व्यवस्थात्मक कारण म्हणजे संसदेची दोन सभागृहे. सिनेट या सभागृहात प्रत्येक राज्याचे दोन सिनेटर्स असतात तर House of Representatives मध्ये आपल्याकडच्या खासदारांसारखे एकेक मतदारसंघाचा एक खासदार असतो. राज्याची लोकसंख्या कितीही असली, तरी त्याचे दोनच सिनेटर्स असतात. म्हणजे, लोकसंख्येच्या प्रमाणात हे प्रतिनिधित्व होत नाही. दहा लाख लोकसंख्या असलेल्या राज्याचे दोन सिनेटर्स आणि एक कोटी लोकसंख्या असणाऱ्या राज्याचेही दोनच सिनेटर्स. त्याचा फायदा तुरळक वस्ती असलेल्या कमी लोकसंख्येच्या राज्यांना होतो. ती राज्ये पारंपरिक बहुधा गोऱ्यांची जमीनदारी असणारी आहेत. परिणामत: कोणत्याही पक्षाला दुसऱ्यापेक्षा कितीही अधिक मते मिळाली तरी त्याचे प्रतिबिंब सिनेटमध्ये पडत नाही. दोन्ही पक्ष बहुधा तुल्यबळ रहातात. मग ज्या विधेयकाला दोन्ही गृहांची मंजुरी लागते, ती मंजूर होत नाहीत.

याशिवाय, ट्रम्पने त्याला सोयीच्या न्यायाधीशांच्या जवळजवळ २०० नेमणूका देशभर केल्या आहेत. हे बहुधा तहहयात न्यायाधीश राहतात. त्यांचे धोरण रिपब्लिकन पक्षाला अनुकूल रहाते. ते निष्पक्षपाती नसतात. विशेषत: विवाद्य निर्वाचनात त्यांचा कल स्पष्ट झालेला आहे. मतदारसंघाची पुनर्रचना हा मुद्दाही या संदर्भात महत्त्वाचा आहे. ज्या पुनर्रचनेमुळे मतदारसंघात कृष्णवर्णीयांचे बहुमत होईल, ती पुनर्रचना रिपब्लिकन पक्ष नाकारतो.

निवडणुकीनंतर तो निर्णयच मान्य नाही ही भूमिका ट्रम्पने घेतली, कोर्टकज्जे करणे ही त्याची उद्योगपती असल्यापासूनची सवय आहे. बिनबुडाचे अनेक खटले तातडीने निरनिराळ्या कोर्टात दाखल करण्यात आले जेणेकरून कालहरण व्हावे आणि जमल्यास अंतिम निकाल अवैध ठरावा. हरलेल्या उमेदवाराने विजयी उमेदवाराचे अभिनंदन लगेच करणे अपेक्षित असते. तो उपचार असला तरी महत्त्वाचा असतो. ट्रम्पने हाही उपचार पाळलेला नाही. त्याला घाबरून असेल किंवा स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठी असेल पण आजवर मोजक्याच रिपब्लिकन मान्यवरांनी निकाल अधिकृतरीत्या स्वीकारला आहे. इतकेच नव्हे तर माईक पॉम्पिओ या परराष्ट्रमंत्र्याने ट्रम्पची पुढची चार वर्षे सुरळीत सुरू होतील असा निर्वाळाही दिला. संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा परिणाम म्हणून त्याच्या साडेसात कोटीतील बहुसंख्य मतदारांना निवडणुकीच्या प्रामाणिकपणावर संशय निर्माण झाला. ट्रम्प हरणे म्हणजे त्याला कमी मते मिळाली असा अर्थ नाही तर त्याची मते 'गायब' झाली [गायब करण्यात आली] असा निष्कर्ष या लोकांनी काढला. निकाल लागल्यानंतर ७० टक्के रिपब्लिकन निवडणूक सदोष मानतात. तर ८६ टक्के डेमोक्रॅट्स निवडणूक न्याय्य झाली असे मानतात. ट्रम्पच्या या दाव्यामागचा प्रयत्न बायडेनची अध्यक्ष म्हणून विश्वासार्हता कमी करणे, दोन्ही पक्षातील दरी वाढवणे हे आहे. त्यामुळे पुढे संसदीय कामकाजात देशहितासाठी दोन्ही पक्षांचे लागणारे ऐक्य कठीण होईल.

एकूण अमेरिकेचे चित्र दुभंग आहे. त्याचे जगावरील परिणाम लवकरच दिसू लागतील.

**करोना**

यात विकारग्रस्त, हॉस्पिटलमध्ये भरती यांची नोंद होते. नजरेआड रहाणारे इतर परिणामही गंभीर आहेत.

● पश्चिमेतील फॅशनचे कपडे विकणाऱ्या अनेक व्यवसायांचे कपडे बनवण्याचे काम म्यानमारमधून केले जात होते. करोनामुळे हे काम बंद पडले. आता त्यातील स्त्रिया

नाईलाजाने वेश्याव्यवसायाकडे वळत आहेत. म्यानमारमध्ये हा व्यवसाय बेकायदेशीर असल्याने त्यांना पोलिसांकडून खंडणीची, फुकट सेक्सची मागणी होते. कुटुंब चालवण्यासाठी त्यांना ही मजबुरी स्वीकारावी लागत आहे. त्यात अनेकदा कुटुंबाची संमती असते, काही स्त्रिया छुपेपणाने हे काम करतात. ज्यांच्या नोकऱ्या गेल्या त्यांना सरकार अपुरी मदत करते. त्यात म्यानमारमध्ये आधीच एड्सचा प्रादुर्भाव आहे. हे काम त्यांचे आरोग्य आणखीच धोक्यात घालत आहे. 'आम्ही गरीब असल्याने जर विकार झालाच तर उपचार परवडणारे नाहीत, आजारी पडणे कुटुंबनिर्वाहासाठीही परवडणारे नाही'. या भीतीत त्या सतत असतात.

● जगातील अति-गरीबांच्यात निम्मी संख्या मुलांची आहे. २०१३ ते २०१८ पर्यंत ही गरीबी कमी करण्याच्या प्रयत्नांना यश येत होते. त्याला करोनामुळे अचानक खीळ बसली आहे. कुपोषणाचे परिणाम आयुष्यभर रहातात. शारीरिक, बौद्धिक वाढ खुंटते, ही मुले मोठेपणी इतरांसारखे काम करू शकत नाहीत. विभिन्न देश अशा मुलांसाठी देत असलेला पैशाचा ओघ आटला आहे. त्यातही सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील आफ्रिकेत परिस्थिती चिंताजनक आहे. तेथे साडेसहा कोटी मुले आताच अति-गरीबीत आहेत.

● आफ्रिकेत करोनाचा परिणाम आजवर तरी अपेक्षेपेक्षा कमी तीव्र आहे. मुळात चाचण्यांचा अभाव, हवामान किंवा जैविकदृष्ट्या उर्वरित जगापेक्षा आफ्रिकनांची या व्हायरसविरुद्ध जास्त प्रतिकारक्षमता असे तर्क आहेत. वैज्ञानिक पुरावा नाही. पण आर्थिक परिणाम तीव्र होऊ लागले आहेत. असंघटित क्षेत्रात लोकांचे व्यवसाय बंद पडत आहेत. रस्त्यावर वस्तू, खाण्याच्या गोष्टी विकणारे, फेरीवाले, टॅक्सीचालक, इत्यादी . शिवाय एड्स, मलेरिया, टी बी याचे आफ्रिकेतील प्रमाण त्या विकारांच्या औषधांच्या पुरवठ्यात खंड आल्याने वाढू शकते. याचा एकत्रित परिणाम म्हणून सुमारे पाच कोटी आफ्रिकन अति-गरीबीत ढकलले जाण्याची शक्यता आहे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk